# आदर्शगाव योजना

आदर्शगाव योजनेची सुरवात ऑगस्ट, १९९३ मध्ये झाली. सन १९९७ मध्ये सदर योजनेचा राज्य योजना म्हणून राज्य योजनेत समावेश करण्यात आला. या योजनेतील सुरुवातीच्या पंचसूत्री कार्यक्रमात आणखी दोन सुत्रांचा समावेश करुन सदर योजना सप्तसूत्री म्हणून घोषित करण्यात आली. त्यामध्ये नशाबंदी, नसबंदी, चराईबंदी, कुऱ्हाडबंदी, बोअरबंदी, लोटाबंदी, श्रमदान यांचा समावेश आहे.

२. योजनेंतर्गत सुरवातीला ३३ जिल्ह्यांतून २०१ गावे निवडण्यात आली होती. परंतु कालानुरुप बदलामुळे काही गांवे या योजनेपासून दूर झाली. सुरुवातीस निवडलेल्या २०१ गावांचे आराखडे पूर्ण करण्याची अंतिम तिथी दिनांक ३० जून, २०११ निश्चित करण्यात आली होती. परंतु त्याचा कालावधी ३१ मार्च २०१२ पर्यंत वाढविण्यास शासनाने मंजुरी दिली आहे. आतापर्यंत ४३ गावे प्राधान्यक्रमाने निवडली आहेत. यापैकी २८ गावे अंतिम टप्यात आहेत. सदर योजनेचे महत्व जनतेपर्यंत पोहचविण्यासाठी नवीन सुधारीत मार्गदर्शन सूचना शासन निर्णय दिनांक १३ ऑगस्ट, २०१० अन्वये निर्गमित करण्यात आली आहे. या अंतर्गत पहिल्या टप्प्यात पुढील १०० गावे निवडण्यास मान्यता दिलेली आहे. त्यापैकी ६६ गावांची निवड करण्यात आली आहे.

३. सन २००९-१० ते २०११-१२ या सलग तीन वर्षात प्रत्येकी रू.२०.०० कोटी अर्थसंकल्पीत करण्यात आले आहेत. सन २०१२-१३ करिता रु. ४.८० कोटी अर्थसंकल्पीत करण्यात आले असून निधी वितरित करण्यात आला आहे. सन २०१४-१५ साठी रु. ७ कोटी निधी अर्थसंकल्पीत झाला असून त्यापैकी रु.४.२० कोटी निधी वितरीत केलेला आहे.